**विशेष दिवाणी मुकदमा क्र.१०९/२०२३**
**निशाणी क्र.१९४ लगत**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्रं.१ ते १० तर्फे ॲड.जी. एस. भोसले</u> :**

हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी रणजित बलोधी वगैरे हे आमच्याच गावातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की त्यांचा व माझा लहानपणापासुन संबंध आहे. पळशी हे गाव त्यावेळी दीड हजार लोकवस्तीचे गाव होते. हे म्हणणे खरे आहे की पळशी गावातील बऱ्यापैकी जमीन जिराईत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी गट नं.१७० ही जिराईत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की जिराईत जमीन म्हणजे गुरांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१७० मध्ये माझ्या नावे दोन गुंठे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की १० गुंठे क्षेत्रामध्ये विलास, दत्तात्रय, छाया, माया व कमलाबाई अशी पाच लोक आहेत. हे म्हणणे खरे आहे की सर्वजण सदाशिवचे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की वारसा हक्कानुसार मला २ गुंठे क्षेत्र येते. मन्सुर शेख याच्याशी माझे सन १९९७ पासुन ओळख आहे. माझी व मन्सुर शेख याची ओळख ही जमीन करण्यावरुन झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की जमीन ही पुर्व-पश्चिम लांबीची आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर जमीनीच्या दोन्ही बाजुची सुरुवातीची जागा ९ फुट रुंदीची आहे. हे मला सांगता येणार नाही की सदर मिळकत ही ९ फुट रुंदीची व साडे चार हजार फुट लांबीची आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यात एका वेळेस ट्रॅक्टर चालत नाही. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकतीच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाही. मी सदर मिळकतीमध्ये ज्वारी व बाजरीचे पिके केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझे व वादीचे कधीही बोलणे झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत मी एकटयाने वहिवाटलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की आमच्याकडे बैलजोडी नाही व ट्रॅक्टर देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की बैलगाडी अथवा ट्रॅक्टरने मेहनत मशागत केली हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे मला सांगता येणार नाही की दावा मिळकतीच्या दोन्ही बाजुला प्रतिवादी क्रं.१० ची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीने मला आजरोजी न्यायालयात आणले. हे म्हणणे खरे आहे की आजरोजी साक्ष आहे हे मला वादीने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीमध्ये

मेहनत मशागत केली हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की मालक व माझ्यामध्ये कोणतीही पावती झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत मला करायला दिली याचा देखील कोणताही कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की वाद मिळकत ही डोंगराळ असुन पडीक आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ वादीने सांगितल्यामुळे त्याला मदत करण्याकरीता मी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील परिच्छेद क्रं.१ ते ६ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की यावर्षी वाद मिळकतीत बाजरीचे पीक केलेले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की यावर्षी मी सदर मिळकत करीत नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २०१७ ते २०१९ च्या अखेरपर्यंत सदर मिळकत मी करीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासात मी सन १९९७ पासुन सदर जमीन कसतो हे खोटे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की सन १९९७ पासुन ते आजअखेरपर्यंत जमीन करत आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्रं.१ ते ९ हे गरीब असुन दुसऱ्या समाजाचे आहेत त्यामुळे त्यांना त्रास देण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर जमीनीबाबत मला काहीही माहिती नसुन ती जमीन मी कधीही केलेली नाही.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २९.०७.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.